# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७४१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/११/२०१६

**१) सीडीआय टाटा गाडीच्या साहीत्याची चोरी . :–**

दिनांक ११/११/२०१६ रोजी १८.०० ते १२/११/२०१६ रोजी ०६.०० वा. दर. यातील फिर्यादी विजय सिताराम ठवरे वय ५० वर्ष, रा. जांबळी सडक यानी भाडयाने आणलेली झेनॉन सीडीआय टाटा २०७ गाडी क्र. एमएच २५ पी ३१०२ ही धानाच्या गोडाउन समोर खुल्या जागेत ठेवली असता कोणीतरी अज्ञात आरोपीने त्या गाडीचे समोरील दोन्ही बाजुचे डिस्कसह व मागील बांजुचे एक डिक्स व टायर टयुबसह, अपोलो कंपनीचे बॅटरी एक असा एकुण २५,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंदीमेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२)शेतात लोखंडी एंगल ठेवण्याच्या कारणावरुन मारहान केली व मोटार सायकलची नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/११/२०१६ रोजी ०९.०० वा. दर. यातील फिर्यादी शिरीश कुमार शोभाराम लोहोबरे वय ३९ वर्ष, रा. श्रीराम नगर तुमसर हा आपल्या शेतात गेला असता शेतामध्ये लोखंडी एंगल व टिन आणि वॉल कंम्पाउंडला लागणारे साहित्य दिसले म्हणुन आरोपीस फिर्यादीने माझे शेतात एंगल का ठेवले असे हटकले असता आरोपीने भांडण करुन शिविगाळ केली व लोखंडी एंगलने उजव्या हातावर मारुन जखमी केल्याने व मोटार सायकल कं. एमएच ३६/३३५६ ची नुकसान केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४,५०४,४२७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो. स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन ग्रामपंचायतचे कामामध्ये अडथळा निर्माण केली व जिवाने मारण्याची धमकी दिली . :–**

दिनांक १२/११/२०१६ रोजी ०८.३० वा. दर. यातील फिर्यादी ही रेवनी गावाची सरपंच असुण फिर्यादी व इतर गावातील लोक मिळुन गावामध्ये प्रवेश करतांना सरकारी जागेवर असलेल्या एका मोठया वडाचे झाडाचे भोवती ओटा बांधण्याकरीता जागेची पाहणी करीत असतांनी यातील चारही आरोपीतांनी संगनमत करुन ग्रामपंचायतचे कामामध्ये अडथळा निर्माण करुन ओटा बांधण्यास विरोध केला व आरोपीतांनी फिर्यादीस लोकांसमोर सार्वजनिक ठिकाणी अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जाणीवपुर्वक, शिविगाळ व अपमानित करुन आरोपी क्र. ४ ने फिर्यादीच्या डाव्या डोळयाच्या वर बुक्की मारुन भुई वर सुजन आल्याने व जिवाने मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३४१,२९४,३२३,५०६,३४ भांदवि सहकलम३(१)(आर),३(१)(एस),३(२)(५)अ, जा.अ.प्र.कायदा १९८९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास एसडीपीओ संख्ये साकोली हे करीत आहेत.

**४)मोटार सायकलची मोटार सायकलच्या धडकेत चार जखमी . :–**

दिनांक ०७/११/२०१६ रोजी १९.३० वा. दर. यातील दोन्ही आरोपी चालकांनी आपआपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने निष्काळजीपने व हयगयीने चालवुन एकमेकांचे मोटार सायकलला जैतपुर शिवार चिचाळ टी पॉईट तई कडे जाणारा डांबरी रोड येथे धडक देऊन स्वत:चे व त्यांचे सोबत मोटार सायकलवर बसलेला विवेक गजानन सेलोकर वय २७ वर्ष, रा. खरबी व डिंगाबर चिंतामन भेंडारकर वय २७ वर्ष, रा. माणेगाव यांचे दुखापतीस स्व:ताहुन कारणीभुत झाल्याने जखमीचे लक्ष हॉस्पीटल भंडारा येथील एमएलसी रिपोर्ट व चौकशी अहवाला वरुन सरतर्फे फिर्यादी सपोनी यादव यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पो. स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**५) मोटार सायकलच्या धडकेत तीन जखमी . :–**

दिनांक ०८/११/२०१६ रोजी ७.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने निष्काळजीपने व हयगयीने चालवुन मोटार सायकल क्र. एमएच ३६/एस ८६११ ला आमोरा समोर पाहुनी येथे धडक मारुन अपघात घडवुन आणला व स्वत: आणि डॉ. रिताराम आत्माराम खुने वय ६४ वर्ष, रा. भंडारा व विवेक संजय शिरसागर वय १४ वर्ष, रा. धर्मापुरी या दोन इसमांना गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने चौकशी वरुन सरतर्फे फिर्यादी सफौ. हलमारे पोलीस यांचे रिपोर्ट वरुन स्टेशन वरठी येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रायपुरकर पो. स्टे. वरठी हे करीत आहेत.